# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६८९ दिनांक ०२.०९.२०२०

### १. नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा.रजि.क्र.I २८२/२०२० भादंविसं ४२० प्रमाणे,

फिर्यादी महिला वय ४६ वर्षे व्यवसाय-गृहीणी, रा.नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.३१/०७/२०२० ते दि.०१/०९/२०२० रोजी पावेतो यातील आरोपीत मो.क्रं. ७७३९३७९१२७, व्हॉटस्ॲप मो.नंबर ९८५१८१३१४६ धारक नामे अभिषेक राजपुत व राकेश शर्मा यांनी पतंजलीचे कोरोनिल किट, पतंजलीची औषधे, व पतंजलीचा किराणा माल पाठविण्यासाठी फिर्यादीकडुन एकुण १,३१,५००/- रुपये ऑनलाईन गुगल पे द्वारे स्विकारुन फिर्यादीस सदरचा माल न देता किंवा फिर्यादीची रक्कम फिर्यादीस परत न देता फिर्यादीची फसवणुक केली आहे. म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारचे आमिषाच्या बळी न पडता संबधीत व्यक्ती किंवा कंपनीबद्दल सविस्तर माहीती प्राप्त करुन आर्थिक व्यवहार करावा.

### २. डहाणु पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I १६३/२०२० भादंविसं ४२०, माहीती तंत्रज्ञान अधिनियम ६६(ड) प्रमाणे.

फिर्यादी पुरुष वय-३० वर्षे, व्यवसाय-प्रोफेसर, रा.पारनाका डहाणू ता.डहाणू जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२३/०८/२०२० रोजी दुपारी १.४१ वा. ते २.३९ वा.चे.दरम्यान फिर्यादी यांचे मोबाईल क्र.८४४६६९८४१८ वरुन पारनाका ता.डहाणू जि.पालघर येथे यातील आरोपीत याने फिर्यादी याचे मोबाईल फोनवर फोन करून तुमची kyc संपलेली आहे असे सांगुन securegw.paytm.in या साईटवर जावुन team viewer quick support हे अँप डाउनलोड करण्यास सांगुन फिर्यादीचे बँक ऑफ बडोदा या बँकेच्या खात्यातुन १/-रुपये,९९९९/-रुपये,९९९९/-रुपये, ९९९०/-रुपये,९९९०/-रुपये, २०००/-रुपये, २०००/-रुपये,२०००/-रुपये असे एकुण ४५,९७९/-रुपये फिर्यादीचा मोबाईल हॅंक करून पेटीएम, फोन पे, फॅक्स मार्ट,फ्रिरिचार्ज पेमेंन्ट, acceiyst solutions या माध्यमातून पैसे वर्ग करून फिर्यादीची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना सायबर पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या नविन फसवणुकीच्या घटना घडत असुन आपले बँक संबधीत माहीती कोणालाही देऊ नका. कोणतीही बॅक आपणास फोनव्दारे तुमचे बॅक खाते, एटीएम कार्ड किंवा kyc संबधीत माहीती विचारत नाही. अशा प्रकारची माहीती आपणास कोणी विचारल्यास तात्काळ आपले बॅक किंवा पोलीस ठाणे यांचेशी संपर्क साधावा.

**३. वसई पोलीस ठाणे गु.रजि.क्र. ३२१/२०२० भादंविसं कलम ३५३, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे**

फिर्यादी पुरुष वय ४० वर्षे, रा.भडाळेपाडा, गिरीज ता.वसई जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.०१/०९/२०२० रोजी ११.३० ते १२.३० वाजता गांव मौजे मालोंडे सिटी सर्वे नं.९० वसई कोळीवाडा येथे ता.वसई जि.पालघर येथे यातील आरोपीत नं. १ व २ यांच्या विरुध्द यापुर्वी अनाधिकृत बांधकामा बाबत फिर्यादीच्या अतिक्रमण विभागा कडुन वसई पो. स्टे. गुन्हा रजि. ग ७८/२०२० एम. आर. टी. पी. ५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. त्याचा आरोपित नं. १ व २ यांनी आकस धरुन त्यांनी पुन्हा बांधकाम सुरु केल्याची माहीत मिळताच फिर्यादी व इतर तिन यांचे अतिक्रमण पथक बांधकामाच्या ठिकाणी गेले असता आरोपीत त्यांचे अंगावर येवुन आरो. नं. १ व २ यांनी धक्काबुक्की करुन "जे करायचे ते करुन घ्या मी सुध्दा तुम्हाला बघुन घेतो." अशी धमकी व शिवीगाळी करुन धक्काबुक्की व ढोश्याबुक्याने मारहाण करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.